।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक : स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना ६ नोव्हेंबर १९८३

RNI NO. MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK MANDESH VARTA

सांगोला जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ६ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३६ वा

सांगोला तालुक्यात फळांपासून विविध पदार्थ तयार करणारा फळप्रक्रिया प्रकल्प उभारणार

शिवसेना- युवासेना मेळाव्यात फलोत्पादन व खारभूमी मंत्री भरतशेठ गोगावले यांची घोषणा

सांगोला : सांगोला तालुका दुष्काळी असला तरी येथील शेतकरी चांगल्या प्रतीचे डाळिंब तसेच विविध फळांचे उत्पादन घेत आहेत. त्यामुळे शहाजीबापू पाटील यांनी मागणी केल्याप्रमाणे सांगोला तालुक्यात फळांपासून विविध पदार्थ तयार करणारा फळप्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक घेऊन निर्णय घेतला जाणार असून विहीर, शेळीपालन, कुक्कुटपालन शेड आणि गोठ्यांसाठीची प्रलंबित अनुदानाची रक्कम पुढील काही दिवसांत लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होईल, असेही त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जमिनीवरचे नेते असून त्यांना सर्वसामान्य जनतेच्या व्यथा चांगल्या प्रकारे समजतात. त्यांच्या हाताला बळ देण्यासाठी सर्वांनी शिवसेना वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन फलोत्पादन व खारभूमी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी केले.

शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी सांगोला येथे आयोजित शिवसेना–युवासेना मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्यमंत्री योगेश कदम, खासदार ज्योतीताई वाघमारे, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, चंद्रहार पाटील, उपनेत्या दीपाली सय्यद, माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्यासह जिल्ह्यातील शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

माजी आमदार शहाजीबापू यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवाबाबत नाराजी व्यक्त केली. ठाकरे शिवसेनेच्या उमेदवारामुळे आपला पराभव झाल्याचा रोष व्यक्त करत त्यांनी अप्रत्यक्षपणे टीका केली. सांगोला तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्याच्या विविध योजना शिवसेना आणि प्रामुख्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मदतीमुळे कार्यान्वित झाल्या आहेत. शिंदे साहेबांनी सांगोला तालुक्यासाठी भरभरून दिले; मात्र या मतदारसंघाचा आमदार शिवसेनेचा झाला नाही. या उपकाराचे ओझे २०२९ च्या निवडणुकीत फेडल्याशिवाय राहणार नाही, असे शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

पुढे बोलताना मंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले की, आम्ही वंदनीय बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित झालेले कार्यकर्ते आहोत. घरात बसून राहण्यापेक्षा जनतेमध्ये राहून शेतकरी, शेतमजूर आणि गोरगरिबांच्या अडचणी सोडविण्यासाठी धावून जाणारे एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाताना पुढील परिणामांची चिंता केली नाही. शिंदे साहेबांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतल्याचा गुवाहाटीला गेलेल्या सर्व आमदारांना आजही अभिमान आहे. सांगोला तालुक्यासाठी सुमारे ५००० कोटी रुपयांचा निधी खर्च करूनही माजी आमदार शहाजीबापू पाटील यांना निवडणुकीत अपयश आले. मात्र, बापू आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत. एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेचे सर्व मंत्री आपण सांगितलेल्या कामांची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सांगोला तालुक्यात फळांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असल्याने त्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारण्याची मागणी शहाजीबापूंनी केली आहे. या मागणीसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री गोगावले यांनी दिले.

राज्यमंत्री योगेश कदम यांनी आपल्या भाषणात कोणत्याही निवडणुका नसताना शहाजीबापू पाटील यांनी आयोजित केलेल्या मेळाव्याचे कौतुक केले. पद हे वारसाहक्काने मिळत नसते, त्यासाठी जमिनीवर राहून जनतेसाठी काम करावे लागते, असे ते म्हणाले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जनतेमध्ये मिसळतात, त्यांच्या अडचणी समजून घेतात आणि अडचणीत असणाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदावर असतानाही आपण एक सामान्य रिक्षाचालक होतो, हे सांगायला ते विसरत नाहीत, असे कदम यांनी नमूद केले. शिंदे साहेबांनी दुष्काळी सांगोला तालुक्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला आहे. शहाजीबापू सध्या पदावर नसले तरी तालुक्यातील जनतेशी त्यांची नाळ आजही घट्ट आहे. त्यामुळेच या मेळाव्यास एवढा मोठा जनसमुदाय उपस्थित झाला आहे. माझ्याकडे गृह, महसूल, पंचायत राज, ग्रामीण विकास, अन्न व नागरी पुरवठा तसेच अन्न व औषध प्रशासन अशी विविध खाती असून, या खात्यांच्या माध्यमातून शहाजीबापूंना तालुक्याच्या विकासासाठी आवश्यक ती मदत प्राधान्याने केली जाईल, असे योगेश कदम यांनी सांगितले.

मेळाव्यात माजी गृहमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, खासदार ज्योतीताई वाघमारे व उपनेत्या दीपाली सय्यद यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे यांनी शहाजीबापूंच्या कार्यकाळात झालेल्या विकासकामांचा आढावा मांडला. तसेच मित्रपक्षातील प्रमुख नेत्यांकडून दुजाभावाची वागणूक दिली जात असल्याची तक्रारही त्यांनी केली.

यावेळी नगराध्यक्ष आनंदा माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, सागर पाटील, ॲड. दिग्विजय पाटील, अनिलदादा सावंत, चरणदास चौगुले, शिंदे, मंगेश चिवटे, साईनाथ अभंगराव, संजय कोकाटे, जि.प. सदस्य दादासाहेब लवटे, शोभाताई खटकाळे, योगेश खटकाळे, उपसभापती अजय सरगर, नगरसेवक माऊली तेली, अरुण पाटील, प्रशांत धनवजीर, विवेक पाटील, विजय इंगोले, काशिलिंग गावडे, सोमेश यावलकर, सतीश सावंत, नगरसेविका राणीताई माने, सीमाताई सरगर, आशाताई यावलकर, छायाताई मेटकरी, वैशाली सावंत, गोदाबाई बनसोडे, धनंजय काळे, कीर्तीपाल बनसोडे, उमेश पाटील, बाळासाहेब बंडगर, दत्ता सावंत, आनंद घोंगडे, सुनील पवार, दीपक खटकाळे, राजकुमार हिवरकर पाटील, विजय बनसोडे, सरपंच रविराज मेटकरी यांच्यासह जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगोला तालुक्याच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वैभवात आणखी एक मानाचा तुरा

इयत्ता तिसरीच्या अभ्यासक्रम पाठ्यपुस्तकात सांगोला येथील प्रसिद्ध आठवडी जनावरांच्या बाजाराची माहिती

सांगोला : सांगोला तालुक्याच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. इयत्ता तिसरीच्या अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तकात 'माहित आहे का तुम्हाला?' या सदरातून सांगोला येथील प्रसिद्ध आठवडी जनावरांच्या बाजाराची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे सांगोल्याची ही वैशिष्ट्यपूर्ण ओळख आता महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत असून, संपूर्ण सांगोला तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

सांगोला शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात दर रविवारी आठवडी जनावरांचा बाजार भरतो. खिल्लार गाई- बैलांसाठी विशेष प्रसिद्ध असलेला हा बाजार केवळ सांगोला तालुक्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात लौकिक प्राप्त केलेला बाजार म्हणून ओळखला जातो. या बाजारात गाई, बैल, म्हशी तसेच शेळ्या- मेंढ्यांसाठी स्वतंत्र विभाग करण्यात आले आहेत.

इयत्ता तिसरीच्या पाठ्यपुस्तकात सांगोल्याच्या या बाजाराची माहिती देताना, खिल्लार गाई-बैलांसाठी हा बाजार प्रसिद्ध असून, खिल्लार बैलाला बैलगाडी शर्यतीसाठी मोठी मागणी असते, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच हा बाजार अनेक गावांमध्येही भरतो, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे.

सांगोल्याच्या वैशिष्ट्यांची शालेय अभ्यासक्रमात नोंद होण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी इयत्ता सहावीच्या भूगोलाच्या पाठ्यपुस्तकात सांगोला तालुक्यातील अजनाळे गावाविषयी माहिती देण्यात आली होती. आता इयत्ता तिसरीच्या

माहीत आहे का तुम्हांला ?

बाजार जसा जीवनावश्यक वस्तूंचा असतो तसाच जनावरांचाही आठवडी बाजार असतो. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथील आठवडी बाजार हा खिल्लार गाई-बैलांसाठी प्रसिद्ध आहे. या बाजारात गाई, बैल, म्हशी, शेळ्या-मेंढ्या असे स्वतंत्र विभाग केले आहेत. रविवार हा बाजाराचा दिवस असतो. खिल्लार बैलाला बैलगाडा शर्यतीसाठी सर्वाधिक मागणी असते. असेच बाजार अनेक गावांमध्येही भरतात.

सांगोला येथील जनावरांचा आठवडी बाजार

पाठ्यपुस्तकात सांगोल्याच्या आठवडी जनावरांच्या बाजाराला स्थान मिळाल्याने सांगोला तालुक्याची ओळख पुन्हा एकदा राज्याच्या शैक्षणिक नकाशावर अधोरेखित झाली आहे.

सांगोल्याचा आठवडी जनावरांचा बाजार म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्था, पशुपालनाची समृद्ध परंपरा, शेतकरी संस्कृती आणि खिल्लार पशुधनाचा गौरव यांचे जिवंत दर्शन घडविणारे केंद्र आहे.

दर रविवारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भरणाऱ्या या बाजाराची ख्याती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. त्यामुळे आता पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून सांगोल्याच्या या वैशिष्ट्यपूर्ण बाजाराची माहिती राज्यभरातील चिमुकल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे.

मुक्त विचार

विचारधन

जो माणूस काळाच्या दुष्ट वर्तुळातही आपल्या कामात संपूर्णपणे गुंतलेला असतो, त्याच्यासाठी वेळ स्वतःच बदलत असतो.

-छत्रपती शिवाजी महाराज

गोकुळाष्टमी : कृष्णजन्माचा उत्सव की माणुसकी जागविण्याचा संदेश?

श्रावण संपत येतो आणि भाद्रपदाची चाहूल लागते, तेव्हा वातावरणात भक्तीचा सुगंध दरवळू लागतो. मंदिरांमध्ये सजावट होते, घराघरांत कृष्णजन्माची तयारी सुरू होते, गोकुळातील नंदलालाच्या बालरूपाचे स्मरण केले जाते आणि मध्यरात्री 'नंद के घर आनंद भयो'चा जयघोष घुमतो. गोकुळाष्टमी म्हणजे केवळ भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव नाही, तर तो अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, प्रेमाला प्रतिष्ठा देण्याचा आणि जीवनात कर्तव्याला सर्वोच्च स्थान देण्याचा संदेश देणारा दिवस आहे. आज कृष्णाची पूजा मोठ्या भक्तिभावाने होते, पण कृष्णाने दिलेल्या विचारांची पूजा आपण किती करतो? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली. कंसाच्या अत्याचाराने मथुरा भयभीत झाली होती. सत्तेच्या मदाने उन्मत्त झालेल्या कंसाने आपल्या बहिणीच्या पोटी जन्मणारा आठवा पुत्र आपला अंत करेल, या भीतीने देवकी-वसुदेवांना कारागृहात डांबले. अशा अत्याचाराच्या अंधारात श्रीकृष्णाचा जन्म झाला. कृष्णाचा जन्मकाळ हा मध्यरात्रीचा, अंधाराचा. पण त्याच अंधारातून प्रकाश जन्माला आला. या कथेत आजच्या समाजासाठी मोठा संदेश दडलेला आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी आशेचा दिवा विझता कामा नये.

आजही समाजात अन्याय, भ्रष्टाचार, हिंसा, द्वेष, अंधश्रद्धा, शोषण आणि असमानतेचे अनेक 'कंस' आहेत. त्यांच्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी प्रत्येकाच्या मनातला कृष्ण जागा झाला पाहिजे. आपण कृष्णाचे चित्र डोळ्यासमोर आणतो तेव्हा हातात बासरी, डोक्यावर मोरपीस, चेहऱ्यावर हास्य आणि भोवती गोकुळातील गायी, असे सुंदर रूप दिसते. पण कृष्णाचे व्यक्तिमत्त्व एवढ्यापुरते मर्यादित नाही. कृष्ण हा प्रेमाचा संदेश देणारा, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारा, मैत्री जपणारा, संकटात मार्ग दाखवणारा आणि योग्य वेळी कठोर निर्णय घेणारा नेतृत्वकर्ता होता. त्याच्या जीवनात बाललीला होती, तर त्याच जीवनात कर्तव्याची कठोर परीक्षा देखील होती. म्हणूनच कृष्ण समजून घेणे म्हणजे केवळ त्याची आरती करणे नव्हे; तर त्याच्या विचारांचा आपल्या आचरणात स्वीकार करणे होय. कृष्णाच्या जीवनातील गोवर्धन पर्वताची कथा आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात विशेष अर्थपूर्ण वाटते. निसर्गाशी माणसाचे नाते काय असावे, याचा संदेश या कथेतून घेतला जाऊ शकतो. आज विकासाच्या नावाखाली जंगलतोड होते, नद्या प्रदूषित होतात, जलस्रोत बुजविले जातात आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. हवामानबदलाचे परिणाम जगभर जाणवत आहेत. गोकुळाष्टमीच्या दिवशी कृष्णाची पूजा करताना निसर्गाची पूजा करण्याचा संकल्पही केला पाहिजे. कृष्णाला आवडणारी गोकुळाची हिरवाई आपण नष्ट करत असू, तर केवळ देव्हाऱ्यातील कृष्णाला फुले वाहून काय उपयोग?

कृष्णाच्या बाललीला हा गोकुळाष्टमीचा सर्वांत आनंददायी भाग. लोणी चोरणारा कान्हा, गोप-गोपिकांबरोबर खेळणारा कृष्ण आणि यशोदेच्या प्रेमात वाढणारा नंदलाल, हे रूप प्रत्येकाच्या मनाला भावते. परंतु या बाललीलांमध्ये जीवनातील साधेपणाचा सुंदर संदेशही आहे. आज बालपणावर स्पर्धेचे, अपेक्षांचे आणि तंत्रज्ञानाचे ओझे वाढत आहे. मुलांच्या हातातील मातीचे खेळणे कमी झाले आणि मोबाईलचा पडदा वाढला. त्यांना खेळू द्या, प्रश्न विचारू द्या, चुका करू द्या, निसर्गाशी जोडू द्या. कृष्णाच्या बाललीलांचे स्मरण म्हणजे बालमनातील निरागसतेचा सन्मान करणेही होय. गोकुळाष्टमी म्हटले की दहीहंडीचा उत्साह अपरिहार्य. उंचावर बांधलेली हंडी फोडण्यासाठी तरुणांची मानवी मनोरे रचले जातात. एखादा पडतो, दुसरा त्याला आधार देतो; एखाद्याचा हात सुटतो, तर दुसरा हात पुढे करतो. ही केवळ करमणूक नाही. दहीहंडी आपल्याला सांगते, एकटा माणूस कितीही ताकदवान असला तरी सामूहिक शक्तीपुढे त्याची ताकद मर्यादित असते. आज समाजात जात, धर्म, भाषा, पक्ष, विचारधारा आणि आर्थिक स्तर यांच्या आधारावर भिंती उभ्या राहत आहेत. अशा वेळी दहीहंडीचा खरा संदेश समजून घेण्याची गरज आहे. एकमेकांना खाली खेचण्यात नव्हे, तर एकमेकांना वर उचलण्यात समाजाचे खरे सामर्थ्य आहे. कृष्णाचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे भगवद्गीतेचा संदेश. युद्धभूमीवर संभ्रमात पडलेल्या अर्जुनाला कृष्णाने कर्तव्याची जाणीव करून दिली.

आजचा माणूसही अनेक प्रश्नांनी घेरलेला आहे. करिअरची चिंता, आर्थिक ताण, नात्यांमधील दुरावा, स्पर्धा, अपयशाची भीती आणि भविष्याची अनिश्चितता यामुळे मानसिक अस्वस्थता वाढत आहे. अशा वेळी गीतेचा कर्मयोग आपल्याला सांगतो, परिस्थितीपासून पळून जाऊ नका, कर्तव्याला सामोरे जा. कर्म करणे आवश्यक आहे, मात्र त्या कर्मामागे प्रामाणिकपणा, विवेक आणि समाजहिताची भावना असली पाहिजे. आज धर्माच्या नावावर समाजात तणाव निर्माण होताना दिसतो. सोशल मीडियावर अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि एकमेकांविरोधात विष पेरणारे शब्द सहज पसरतात. कृष्णाच्या नावाचा जयघोष करणाऱ्या समाजाने कृष्णाचा संवाद, मैत्री आणि विवेकाचा मार्ग विसरता कामा नये. कृष्णाने विविध व्यक्तींशी नाती जोडली. सुदाम्यासारख्या मित्राशी असलेली त्याची मैत्री आजही आदर्श मानली जाते. या मैत्रीत श्रीमंती-गरिबीची भिंत नव्हती. मग कृष्णभक्तीचा अर्थ आपल्या शेजाऱ्याच्या दुःखाकडे पाठ फिरवणे कसा असू शकतो? देवाला नैवेद्य दाखविण्यापूर्वी भुकेल्या माणसाच्या ताटात अन्न वाढले, तर तीच खरी भक्ती!

कृष्णाच्या कथांमध्ये राधा, रुक्मिणी, द्रौपदी आणि इतर स्त्री व्यक्तिरेखांशी संबंधित अनेक संदर्भ येतात. आजच्या समाजात महिलांच्या सुरक्षिततेचा आणि सन्मानाचा प्रश्न गंभीर आहे. गोकुळाष्टमीच्या निमित्ताने मंदिरात दिवे लावण्याबरोबरच मुली-महिलांना सुरक्षित वातावरण देण्याचा संकल्प केला पाहिजे. स्त्रीचा सन्मान करणारा समाजच खऱ्या अर्थाने संस्कृतीचा वारसदार म्हणवून घेऊ शकतो. उत्सव हवा, पण दिखावा नको!गोकुळाष्टमी मोठ्या उत्साहात साजरी झाली पाहिजे. मात्र उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण, प्लास्टिकचा अतिरेक, पाण्याची नासाडी किंवा धोकादायक दहीहंडी यांना प्रोत्साहन देणे योग्य नाही. उत्सव आनंदाचा असावा, पण कोणाच्या जीवावर बेतणारा नसावा. बालकृष्णाच्या जन्माचा उत्सव साजरा करताना बालकांच्या सुरक्षिततेचा विचार झाला पाहिजे. दहीहंडीमध्ये सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे. पर्यावरणपूरक सजावट आणि जबाबदार उत्सवाला प्राधान्य दिले पाहिजे.

कृष्ण जन्माला आला म्हणून कंसाचा अंत झाला, अशी कथा आपण ऐकतो. पण आजच्या काळातला 'कंस' एखादी व्यक्ती नसून अन्याय, भ्रष्टाचार, हिंसा, द्वेष, शोषण, व्यसन आणि असंवेदनशीलता हीच अनेक रूपे आहेत. ही वाईट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी बाहेर कुठेतरी कृष्ण शोधण्याची गरज नाही. आपल्या विवेकात, आपल्या कृतीत आणि आपल्या माणुसकीत कृष्ण जागा करावा लागेल. गोकुळाष्टमी म्हणजे देवळात गर्दी करण्याचा दिवस नाही, तर मनातील अंधार दूर करण्याचा दिवस आहे. कृष्णाची बासरी आपल्याला प्रेम शिकवो, कृष्णाचे सुदर्शन अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देवो, गीता कर्तव्याची दिशा देवो, दहीहंडी एकतेचा संदेश देवो आणि गोकुळातील निरागसता आपल्या मनात कायम राहो. कृष्णाला डोक्यावर घेण्यापेक्षा त्याचे विचार डोक्यात घेणे अधिक गरजेचे आहे. आज समाजाला आणखी एका कृष्णजन्माची वाट पाहण्याची गरज नाही. प्रत्येक घरात, प्रत्येक मनात आणि प्रत्येक कृतीत माणुसकीचा कृष्ण जन्माला आला, तरच समाजातील अन्यायाचे कंस खऱ्या अर्थाने पराभूत होतील. हीच गोकुळाष्टमीची खरी शिकवण, हीच कृष्णभक्तीची खरी दिशा आणि हीच आजच्या काळाची सर्वांत मोठी गरज! श्रीकृष्णाच्या प्रेमाचा, कर्मयोगाचा आणि माणुसकीचा संदेश आपल्या जीवनात उतरू दे. समाजात शांतता, समता, बंधुता आणि सद्भावना नांदू दे. सर्वांना गोकुळाष्टमीच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

-प्रवीण बागडे,नागपूर

राज्यात वाढती गुन्हेगारी : कायदा कडक हवा, पण समाजही जागा हवा!

सुरक्षिततेचा हक्क प्रत्येक नागरिकाचा, आता ठोस पावले उचलण्याची वेळ

महाराष्ट्र हे प्रगत, औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध राज्य म्हणून ओळखले जाते. मुंबईसारखे जागतिक शहर, पुण्यासारखे शिक्षणाचे केंद्र, नागपूरसारखे वेगाने विकसित होणारे शहर आणि असंख्य गावे-मोठी शहरे असा विविधतेने नटलेला हा प्रदेश. मात्र, या प्रगतीच्या चित्राला वाढती गुन्हेगारी काळा डाग लावत आहे. खून, दरोडे, लूटमार, महिलांवरील अत्याचार, बालगुन्हेगारी, सायबर फसवणूक, अमली पदार्थांचा वाढता विळखा, घरफोड्या आणि आर्थिक गुन्हे यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत असेल, तर ही बाब केवळ पोलिसांची नव्हे, तर संपूर्ण समाजाची चिंता आहे. गुन्हा घडल्यानंतर आरोपी पकडणे महत्त्वाचेच, पण गुन्हा घडण्यापूर्वी त्याला रोखणे ही खरी कसोटी आहे.

गुन्हेगारी ही अचानक निर्माण होत नाही. तिच्यामागे अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणांची गुंतागुंत असते. बेरोजगारी, व्यसनाधीनता, आर्थिक विषमता, कौटुंबिक कलह, बालकांकडे होणारे दुर्लक्ष, शिक्षणातील गळती, चुकीची संगत आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे उदात्तीकरण ही काही कारणे आहेत. मोबाईल आणि सोशल मीडियाने जग जवळ आणले, पण त्याचबरोबर गुन्हेगारीचे नवे मार्गही खुले केले. बनावट लिंक, जद्भ फसवणूक, ऑनलाइन बँकिंग घोटाळे, बनावट गुंतवणूक योजना, सोशल मीडिया ब्लॅकमेलिंग आणि डिजिटल ओळख चोरी यामुळे सामान्य नागरिकांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेक जण लक्ष्य बनत आहेत. गुन्हेगार बदलला आहे, मग गुन्हेगारी रोखण्याची यंत्रणाही बदलली पाहिजे.

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सर्वाधिक गंभीर आहे. छेडछाड, विनयभंग, कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार आणि ऑनलाइन छळाच्या घटना समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. महिला रात्री सुरक्षितपणे प्रवास करू शकत नसेल, मुलगी शाळा-कॉलेजमधून परतताना पालक चिंतेत असतील, तर विकासाच्या मोठमोठ्या आकडेवारीला अर्थ उरत नाही. महिलांसाठी प्रकाशमान रस्ते, प्रभावी सीसीटीव्ही व्यवस्था, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, तत्पर हेल्पलाइन, महिला पोलिसांची उपलब्धता आणि तक्रारींचे संवेदनशीलपणे निवारण आवश्यक आहे. महिला सुरक्षेची जबाबदारी केवळ पोलिसांची नाही. घरातील संस्कारांपासून शाळेतील शिक्षणापर्यंत आणि समाजाच्या मानसिकतेपासून न्यायव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटकाला यात भूमिका बजावावी लागेल.

पूर्वी चोर घराच्या खिडकीतून येत असे, पण आज तो मोबाईलच्या पडद्यामागे बसतो! ही बदलत्या गुन्हेगारीची सर्वात मोठी शोकांतिका आहे. एखाद्या व्यक्तीचा बँक खाते क्रमांक, जद्भ, पासवर्ड किंवा वैयक्तिक माहिती मिळवून काही मिनिटांत आर्थिक नुकसान केले जाते. सायबर गुन्ह्यांविरोधात केवळ पोलिसांची तांत्रिक क्षमता वाढवून चालणार नाही. डिजिटल साक्षरता ही आजच्या काळातील नागरिक सुरक्षा आहे. शाळा-महाविद्यालयांपासून ग्रामपंचायत स्तरापर्यंत सायबर सुरक्षा जनजागृती झाली पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन मोहीम राबवली पाहिजे. बँका, दूरसंचार कंपन्या आणि पोलीस यांच्यातील समन्वय अधिक वेगवान झाला पाहिजे.

गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांचे मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान, फॉरेन्सिक सुविधा, प्रशिक्षण आणि वाहनसुविधा वाढवणे अत्यावश्यक आहे. पोलिसांवर वाढणारा कामाचा ताण कमी करण्यासाठी मनुष्यबळाची उपलब्धता वाढवावी. तपासात तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर झाला पाहिजे. सीसीटीव्ही नेटवर्क, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक तपास आणि डेटा विश्लेषण यांचा समन्वय वाढवला पाहिजे. मात्र, प्रत्येक गुन्ह्याची जबाबदारी पोलिसांच्या माथी मारणे ही समाजाची सोयीस्कर पळवाट आहे. घरात मुलांवर संस्कार कोण करणार? व्यसनाच्या आहारी जाणाऱ्या तरुणाला थांबवणार कोण? गुन्हेगारीला ग्लॅमर देणाऱ्या मानसिकतेला विरोध कोण करणार? याची उत्तरे समाजानेच शोधली पाहिजेत.

तरुणाई ही राज्याची सर्वात मोठी ताकद आहे. पण बेरोजगारी, व्यसन, चुकीची संगत आणि सोशल मीडियावरील हिंसक किंवा गुन्हेगारी जीवनशैलीचे आकर्षण यामुळे काही तरुण चुकीच्या दिशेने जातात. यासाठी केवळ शिक्षा पुरेशी नाही. क्रीडा, कौशल्यविकास, रोजगार, व्यावसायिक प्रशिक्षण, समुपदेशन आणि सर्जनशील उपक्रमांची दारे अधिक खुली झाली पाहिजेत. एका तरुणाला रोजगार मिळाला, तर कदाचित एका गुन्ह्याला सुरुवात होण्यापासून रोखता येईल. अनेक गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर व्यसनाचा प्रश्न दिसतो. दारू, अमली पदार्थ आणि इतर व्यसनांमुळे व्यक्तीची निर्णयक्षमता, आर्थिक स्थिती आणि कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होऊ शकते. म्हणूनच व्यसनविरोधी कारवाई केवळ अधूनमधून होणाऱ्या छाप्यांपुरती मर्यादित न राहता पुरवठा साखळीवर कठोर कारवाई, पुनर्वसन आणि जनजागृती यांचा एकत्रित कार्यक्रम असला पाहिजे. व्यसनाधीन व्यक्तीला गुन्हेगार म्हणून हिणवण्यापेक्षा, त्याला पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुनर्वसनाची दारेही उघडी ठेवली पाहिजेत.

गुन्हेगारीविरोधी लढ्याची सुरुवात पोलिस ठाण्यात नव्हे, तर घर आणि शाळेत झाली पाहिजे. मुलांना कायदा, संविधान, स्त्री-सन्मान, डिजिटल सुरक्षितता, व्यसनांचे दुष्परिणाम, संवादाचे महत्त्व आणि संघर्षाचे अहिंसक मार्ग शिकवले पाहिजेत. मुलांच्या वर्तनात अचानक बदल दिसल्यास पालकांनी त्याकडे दुर्लक्ष करू नये. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सामाजिक अडचणींबाबत संवेदनशील राहिले पाहिजे. गुन्हेगारीविरोधी लढ्यात नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. संशयास्पद हालचालींकडे दुर्लक्ष न करणे, सायबर फसवणूक झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेशी संपर्क साधणे, अफवा न पसरवणे आणि कायदा हातात न घेणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. गुन्हेगाराला शिक्षा देणे न्यायव्यवस्थेचे काम आहे, जमावाने न्याय करणे हा स्वतः एक गंभीर धोका आहे. कायदा हातात घेणारा जमाव आणि कायदा मोडणारा गुन्हेगार, या दोघांमधील सीमारेषा समाजाने विसरता कामा नये.

महाराष्ट्राला केवळ मोठे रस्ते, उंच इमारती आणि औद्योगिक प्रगती नको, निर्भयपणे जगणारा नागरिक हवा आहे. कायद्याचा धाक, पोलिसांची कार्यक्षमता, न्यायाची गती, तरुणांना संधी आणि समाजाची संवेदनशीलता, या पाच आधारस्तंभांवरच सुरक्षित महाराष्ट्र उभा राहू शकतो. गुन्हेगाराला कायद्याची भीती आणि सामान्य माणसाला कायद्याचा विश्वास वाटला, तरच खऱ्या अर्थाने न्याय्य आणि सुरक्षित महाराष्ट्र घडेल. सुरक्षित नागरिक, सक्षम यंत्रणा आणि संवेदनशील समाज, हीच महाराष्ट्राच्या प्रगतीची खरी दिशा!

-प्रवीण बागडे,नागपूर

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-४४ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

एल के पी मल्टीस्टेटला राज्यस्तरीय उत्कृष्ट संस्था पुरस्कार प्राप्त

अभिनेते जितेंद्र जोशी यांच्या हस्ते पुणे येथे शानदार समारंभात पुरस्कार वितरण संपन्न

सांगोला : संपूर्ण महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यामध्ये ४३ शाखांच्या माध्यमातून उत्तमरीत्या सेवा देणाऱ्या एलकेपी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या संस्थेच्या वित्तीय क्षेत्रातील आदर्शवत कामकाजाची दखल घेऊन 'रिसेल इन'या अग्रगण्य संस्थेच्या वतीने या संस्थेला 'राज्यस्तरीय उत्कृष्ट संस्था पुरस्कार' प्राप्त झाला असून भारतीय सिनेसृष्टीतील अष्टपैलू अभिनयासाठी प्रसिद्ध असलेले उत्कृष्ट मराठी अभिनेते जितेंद्र जोशी यांच्या शुभहस्ते पुणे येथे एका शानदार समारंभामध्ये सन्मानपूर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'गोल्ड लोन' या कर्ज प्रकारामध्ये एलकेपी मल्टीस्टेटने महाराष्ट्रामध्ये अत्यंत दैदीप्यमान आघाडी घेतली असून या सुरक्षित कर्ज प्रकारामुळे ही संस्था अत्यंत मजबूतपणे वित्तीय क्षेत्रामध्ये आपली वाटचाल करत आहे. रिसेल मार्केट अँड रिसर्च ही भारतातील विविध क्षेत्रातील गुणवत्तेचा कसून शोध घेणारी एक दर्जेदार संस्था असून महाराष्ट्रातील सर्वांगाने गुणवत्तापूर्ण असलेल्या आणि लोकोत्तर सेवा देणाऱ्या काही निवडक संस्था तसेच व्यक्ती यांना मान्यवर सेलिब्रिटींच्या शुभहस्ते पुरस्काराने सन्मानित करते.

सहकाराची जाण असणारे व बँकिंग क्षेत्राचा सखोल अभ्यास असणारे आणि जवळपास २०-२२ वर्षांपासून वित्तीय क्षेत्रामध्ये यशस्वीरित्या कार्यरत असणारे सहकाररत्न अनिलभाऊ इंगवले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली एलकेपी मल्टीस्टेट ही संस्था वाटचाल करत असून गतवर्षी सुमारे साडेचारशे कोटीहून अधिकचा व्यवसाय या संस्थेने केलेला आहे. अनेक प्रकारच्या बँकिंग सुविधा तसेच विविध कर्ज प्रकारांच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या या संस्थेचे जवळपास ८५% कर्ज हे 'गोल्ड लोन' असून अत्यंत सुरक्षितपणे कामगिरी या संस्थेची आजवर राहिलेली आहे.

ठेवीदारांच्या ठेवींची सुरक्षा, सभासदांचे हित आणि ग्राहकांची सेवा या त्रिसूत्रीच्या माध्यमातून विशेषतः 'सोनेतारण कर्ज' यामध्ये अत्यंत उल्लेखनीय यश या संस्थेने प्राप्त केले असून याचीच दखल घेऊन 'रिसेल इन अवॉर्ड २०२६' हा अत्यंत सन्मानाचा पुरस्कार या संस्थेला प्राप्त झाला आहे.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे सभासद, सर्व ठेवीदार आणि ग्राहक यांच्यामध्ये समाधानाचे, आनंदाचे आणि विश्वासाचे वातावरण पसरले असून या पुरस्कारामुळे या संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोचला गेला आहे. यामुळे आम्ही सर्वजण प्रेरित झालो आहोत. आमच्या सर्व सन्माननीय ठेवेदारांच्या आणि ग्राहकांच्या आशीर्वादावर उत्तरोत्तर आम्ही प्रगतीचे एक एक पाऊल पुढे टाकत राहू, अशा भावना यावेळी संस्थेचे चेअरमन सहकाररत्न अनिलभाऊ इंगवले यांनी व्यक्त केल्या.

पुरस्काराचा सन्मान स्वीकारताना सूर्योदय महिला अर्बनच्या चेअरमन आणि अनिलभाऊ इंगवले यांच्या सुविद्य पत्नी सौ अर्चनाताई इंगवले, एल के पी मल्टीस्टेटचे सीईओ राजकुमार बहिरे तसेच सूर्योदय अर्बनचे सीईओ अजित दिघे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

व्यक्तिमत्त्व हे घडवावे लागते, विकत घेता येत नाही-प्रा.राजेंद्र पाटील

फॅबटेक इंजिनिअरिंग मध्ये व्यक्तीमत्व विकास विषयावर व्याख्यान संपन्न

सांगोला : विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सकारात्मक विचारसरणी, शिस्त आणि प्रभावी संवादकौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये केवळ शैक्षणिक ज्ञान महत्त्वाचे नसून, त्यासोबत व्यक्तिमत्त्व विकासाची ही तितकीच गरज आहे.स्वतःमधील गुण-दोष ओळखून सातत्याने त्यावर काम केल्यास व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी बनते.वेळेचे नियोजन, योग्य निर्णयक्षमता, नेतृत्वगुण आणि इतरांशी सकारात्मक संवाद ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. व्यक्तिमत्त्व हे घडवावे लागते ते विकत घेता येत नाही, असे सांगत प्रा. राजेंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंग व सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर गुरुवार दिनांक ३ सप्टेंबर २०२६ रोजी प्रा. राजेंद्र पाटील याचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रा.राजेंद्र पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार डॉ.संजय पवार यांनी केले.

रोडरोमियोंच्या विरोधात मनसे आक्रमक; विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना मैदानात!

सांगोला : शाळा-महाविद्यालय परिसर, बसस्थानक तसेच प्रमुख रस्त्यांवर विद्यार्थिनींची छेडछाड, अश्लील कमेंट्स, पाठलाग व विनाकारण त्रास देणाऱ्या रोडरोमियोंविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना आक्रमक झाली आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीर्याने घेत महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुकाध्यक्ष विठ्ठल शिंदे यांनी पोलिस प्रशासनाची भेट घेत निवेदन सादर केले. शाळा-महाविद्यालय सुटण्याच्या वेळेत काही टवाळखोर तरुण परिसरात विनाकारण थांबून विद्यार्थिनींचा पाठलाग करणे, अश्लील शेरेबाजी करणे तसेच त्रास देण्याचे प्रकार करत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे रोडरोमियोंवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी विठ्ठल शिंदे यांनी निवेदनातून केली.

विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. मुलींना त्रास देणाऱ्या रोडरोमियोंना कायद्याने धडा शिकवा. पोलिसांनी तातडीने कारवाई करून अशा टवाळखोरांना आळा घालावा. प्रशासनाने कारवाईकडे दुर्लक्ष केल्यास महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना मनसे स्टाईल आंदोलन उभारेल, असा इशारा तालुकाध्यक्ष विठ्ठल शिंदे यांनी दिला.

यावेळी शाळा व महाविद्यालय परिसरात पोलिसांची गस्त वाढवावी, विशेषतः विद्यार्थिनींच्या येण्या-जाण्याच्या वेळेत साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती करावी, अशी मागणीही करण्यात आली. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडताना त्यांच्या पालकांना चिंता वाटू नये, यासाठी परिसर सुरक्षित असणे गरजेचे आहे.

रोडरोमियोंची दहशत निर्माण होऊ देणार नाही, असे विठ्ठल शिंदे, तालुकाध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना यांनी स्पष्ट केले. विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा मुद्दा पुढे नेत विठ्ठल शिंदे यांनी प्रशासनाला थेट इशारा दिल्याने आता पोलिस प्रशासन या रोडरोमियोंविरोधात कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मिरवणूक मार्गावरील खड्डे, विजेचे भारनियमन, विसर्जन स्थळावरील आवश्यक व्यवस्था यावर प्रश्नचिन्ह

गणेशोत्सव साजरा करताना सर्व आवश्यक परवानग्या रीतसर घेऊन नियमांचे काटेकोर पालन करावे : उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे

सांगोला : गणेशोत्सव साजरा करताना सर्व आवश्यक परवानग्या रीतसर घेऊन नियमांचे काटेकोर पालन करावे. देश-विदेशात साजऱ्या होणाऱ्या या उत्सवाला कोणत्याही प्रकारे गालबोट लागणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करून आपल्या उत्कृष्ट संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे यांनी केले.

बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी सांगोला पंचायत समितीच्या बचत भवन येथे शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मागील वर्षीच्या गणेशोत्सवादरम्यान पोलीस स्टेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या गणेशोत्सव स्पर्धेतील विजेत्या मंडळांचा बक्षीस वितरण समारंभही उत्साहात संपन्न झाला.

या बैठकीस तहसीलदार बाळूताई भागवत, पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्यासह नगरपरिषद व महावितरण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि शांतता समितीच्या सदस्यांनी उत्सवादरम्यान येणाऱ्या विविध अडचणी व समस्यांबाबत चर्चा केली. मिरवणूक मार्गावरील खड्डे, विजेचे भारनियमन, विसर्जनस्थळावरील आवश्यक व्यवस्था तसेच डीजे वाजविण्यासंदर्भातील प्रश्न मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केले. यावर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती देऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत चर्चा केली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब ठोकळे, मनसेचे विनोद बाबर, रवींद्र कांबळे, अरुण लिगाडे तसेच ज्येष्ठ नागरिक मुकुंद भोसेकर यांनीही उत्सवादरम्यान उद्भवणाऱ्या विविध समस्यांबाबत सूचना मांडून गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. उत्सवादरम्यान सर्व मंडळांनी वेळेचे बंधन पाळावे. आपल्या कृतीमुळे कोणाच्याही धार्मिक अथवा सामाजिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची काळजी घेऊन शांततेत आणि आनंदाच्या वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा, असेही त्यांनी सांगितले. गणेशोत्सव काळात पोलीस प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य नियमांचे काटेकोर पालन करून गणेशोत्सव साजरा करा-डॉ.शिवपूजे कोणत्याही परिस्थितीत डीजेसाठी परवानगी नाही पारंपरिक वाद्यांचा वापर करून महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन घडवावे.

डीजेच्या वापराबाबत स्पष्ट भूमिका मांडताना उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. शिवपूजे यांनी कोणत्याही परिस्थितीत डीजे वाजविण्यास परवानगी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांचा वापर करून महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यावेळी २०२६ च्या गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी होऊन यश संपादन केलेल्या मंडळांचे अभिनंदन करण्यात आले. चालू वर्षातही अशाच प्रकारची स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून जास्तीत जास्त गणेश मंडळांनी त्यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

तहसीलदार बाळूताई भागवत यांनी सर्व गणेश मंडळांनी संबंधित विभागांच्या आवश्यक परवानग्या रीतसर घेऊन उत्सव निर्विघ्नपणे पार पाडावा, असे सांगितले. तसेच तालुक्यातील पाण्याची टंचाई दूर होऊन चांगला पाऊस पडावा, यासाठी गणरायाकडे प्रार्थना करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सुरुवातीस पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी गणेशोत्सव काळात मंडळांकडून काय अपेक्षित आहे, याची सविस्तर माहिती दिली. सांगोला पोलीस स्टेशनकडून सर्व गणेश मंडळांना आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली

सांगोला एसटी स्टँड परिसरात निर्भया पथकाची कारवाई
१३ जणांकडून ११ हजारांचा दंड

सांगोला : मंगळवेढा उपविभागातील निर्भया पथकाने बुधवार दि.२ सप्टेंबर रोजी सांगोला शहरातील एसटी स्टँड परिसरात विशेष पेट्रोलिंग करून विनाकारण फिरणाऱ्या रोडरोमियोंवर कारवाई केली. यावेळी संबंधितांवर बीपी अॅक्ट कलम ११०/११७ अन्वये कारवाई करण्यात आली.

तसेच वाहतूक अंमलदारांच्या संयुक्त कारवाईत मोटार वाहन कायद्यान्वये एकूण १३ जणांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ११ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपूजे तसेच पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक चव्हाण, हवालदार राजगे तसेच पोलीस कर्मचारी कुंभार, पांढरे, मंडले व आवटे यांनी सहभाग घेतला.

सांगोला शहरात सार्वजनिक ठिकाणी विनाकारण फिरून नागरिकांना त्रास देणाऱ्या तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पुढील काळातही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा संदेश या मोहिमेतून दिसून आला.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

सांगोला तालुक्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सांगोला शहर-तालुका कडकडीत बंद

सांगोला : मराठा आरक्षणाच्या न्याय्य हक्काच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाज, सांगोला तालुक्याच्या वतीने शनिवारी ५ सप्टेंबर रोजी सांगोला शहर व तालुका बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला शहरासह तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्यापारी, व्यावसायिक, विविध संस्था, संघटना तसेच नागरिकांनी बंदमध्ये सहभागी होत मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला. या आंदोलनाचा भाग म्हणून महात्मा फुले चौकातून तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.

मोर्चामध्ये मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध घोषणा देत मोर्चेकऱ्यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आपली एकजूट दाखवून दिली. मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर त्याचे सभेत रूपांतर झाले. तहसील कार्यालयाच्या परिसरात झालेल्या सभेत अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीचा शासनाने गांभीर्याने विचार करून न्याय्य तोडगा काढावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या लढ्याला सांगोला तालुक्यातून यापुढेही ठामपणे पाठिंबा देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. 'एक मराठा, लाख मराठा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी समाजाची एकजूट या मोर्चातून दिसून आली.बंदमुळे शहरातील प्रमुख बाजारपेठा व विविध व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या होत्या. मात्र अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आल्या होत्या. नागरिकांनी शांततेच्या मार्गाने बंद पाळत आंदोलनाला पाठिंबा दिला.

दरम्यान, पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर व तालुक्यात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चा तसेच बंदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. संपूर्ण बंद व मोर्चा शांततेत पार पडला. बंद यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणारे व्यापारी, व्यावसायिक, संस्था, संघटना तसेच नागरिकांचे सकल मराठा समाज, सांगोला तालुक्याच्या वतीने आभार मानण्यात आले.

सांगोला ते सागरेश्वर अभयारण्य 'श्रावण मास यात्रा' उत्साहात संपन्न; १६ बसमधून ७०० महिलांचा सहभाग

सांगोला : शिवसेनेच्या वतीने माजी नगरसेवक सोमेश यावलकर व नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या पुढाकारातून सांगोला शहरातील महिलांसाठी आयोजित करण्यात आलेली सांगोला ते सागरेश्वर अभयारण्य मोफत 'श्रावण मास यात्रा' भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न मिळाला. बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी सांगोल्यातून १६ बसमधून श्रावण मास यात्रेला सुरुवात झाली. सांगोल्यातून निघालेल्या या यात्रेदरम्यान महिलांनी सागरेश्वर अभयारण्य परिसराला भेट देत धार्मिक व निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेतला.

श्रावण महिन्याच्या निमित्ताने भक्तिमय वातावरणात महिलांनी दर्शन घेतले. प्रवासादरम्यान महिलांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

या यात्रेत तब्बल १६ बसमधून सुमारे ७०० महिलांनी सहभाग घेतला. गेल्या दोन वर्षांपासून सोमेश यावलकर व सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या वतीने स्वखर्चातून हा सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदाही या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद भागांतून सुमारे ७०० महिला या यात्रेत सहभागी झाल्या. मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतल्याने यात्रेला भव्य स्वरूप प्राप्त झाले.

महिलांनी एकमेकींसोबत आनंदाचे क्षण अनुभवत श्रावण मास यात्रेचा उत्स्फूर्त आनंद लुटला. महिलांना धार्मिक स्थळांचे दर्शन तसेच निसर्गरम्य परिसराची सफर घडवून आणण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही यात्रा पूर्णपणे मोफत होती.

सलग दुसऱ्या वर्षी स्वखर्चातून हा उपक्रम राबवून महिलांसाठी धार्मिक व सामाजिक उपक्रमाची परंपरा कायम ठेवल्याबद्दल माजी नगरसेवक सोमेश यावलकर व नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांचे महिलांसह नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.